किंमत - वार्षिक वर्गणी २००/- रुपये

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्‌बोधक व माहितीपूर्ण मासिक

३● दीपदान
५● संरक्षणसिद्धता हे प्रत्येकच नागरिकाचे कर्तव्य !
१५● भरड धान्यांना पुन्हा सुगीचे दिवस
२१ ● कृषिसंस्कृतीचा अग्रदूत

**खंड १७ : अंक ८ नोव्हेंबर २०१८**

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**

वार्षिक वर्गणी २००/- रुपये (परदेशस्थ वाचकांसाठी $ २०) वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/ चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका'** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.

वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध,
९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,
(रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२, २५६५७२१०, २५६५७६९७
ई-मेलः- ispe@vsnl.net
website-http:// www.ispepune.org.in

**अर्थबोधपत्रिका**
**खंड १७ (अंक ८) नोव्हेंबर २०१८**
**संपादक - अभय टिळक**
**सहयोगी संपादक - पराग पोतदार**

### *'अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?*

- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- निःपक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

### अर्थबोधपत्रिकेचा हेतू

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियत-कालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यतः इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.**

### *अर्थबोधपत्रिका कशी साकारते?*

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.

◆अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# दीपदान

'अर्थबोधपत्रिके'च्या वाचक कुटुंबातील सर्व लहानथोरांना ही दिवाळी आणि नव्याने सुरुहोणारे संवत्सर आनंदाचे, भरभराटीचे, सुखसमृद्धीचे आणि मुख्य म्हणजे उत्तम आरोग्याचे ठरो.

निदान महाराष्ट्राच्या दृष्टीने तरी येता काळ कसोटी पाहणारा ठरेल. त्याचे कारण उघड आहे. यंदा पावसाने राज्याच्या ब-याच मोठ्या भागावर कृपेचा वर्षाव केला नाही. एक पावसाळा मनासारखा झाला नाही की सगळ्याच जगण्यावर चिंतेची काजळी दाटत राहते. परंतु, समाजाची सामूहिक इच्छाशक्ती एकवटून या अस्मानी संकटाचा सामना करण्यास आपण सारे सिद्ध होऊ असा आशावाद बाळगत दिवाळीचा सण आपण सगळेच साजरा करूयात. निश्चयाच्या त्याच बळाचे तेलतूप पुरवत यंदाच्या दिवाळीचे दीपदान आपल्याला सजवायचे आहे.

दिवाळीच्या मुहूर्तावर खास दिवाळी अंक वगैरे काढण्याची 'अर्थबोधपत्रिके'ची परंपरा वगैरे काहीच नाही. तरीदेखील या अंकात एक नवीन प्रयोग करून बघितलेला आहे. वाचकराजाच्या पसंतीस तो उतरेल, अशी अपेक्षावजा आशा आहे. आपल्या परंपरेमध्ये दिवाळी हा कृषिसंस्कृतीचा सोहळा म्हणूनच साजरा केला जातो. पावसाळ्यात पेरलेले धान्य दिवाळीच्या तोंडावर पिकून तयार होते आणि नवीन धान्यलक्ष्मीच्या आगमनाद्वारे कणग्यांची पोटे तुडुंब भरतात. पशुपालनाच्या भटक्या जीवनपर्वामधून उत्क्रांत होत शेतीप्रधान व्यवस्थेतील स्थिर जीवनपद्धतीचा अंगीकार करणे, हा मानवी प्रगतीच्या प्रदीर्घ वाटचालीतील एक अतिशय महत्त्वाचा, मोठा आणि तितकाच निर्णायक टप्पा होय. या स्थित्यंतराची आपल्या परंपरेतील साहित्यामध्ये अनेकानेक प्रतिबिंबे उमटलेली आढळतात. 'भाकड पुराणकथा' अथवा 'पुराणातील वांगी' म्हणून प्रसंगी आपण त्या संचिताची क्वचित थट्टाही करतो. मात्र, त्याच साहित्यसंभाराचा अंमळ वेगळ्या नजरेने धांडोळा घेतला तर संस्कृतिस्थित्यंतराच्या त्यांत दडलेल्या अनंत पाउलखुणा पृष्ठभागावर उमलून येतात. अवघ्या भारतीय मनाला अंतर्बाह्य व्यापून उरलेल्या कृष्णचरित्रातील बलरामाची व्यक्तिरेखा आपण अगदी अपवादानेच



नीट बघतो वा अभ्यासतो. अजोड गदावीर म्हणून सर्वत्र लौकिक मिरवणा-या बलरामाने नांगर आणि मुसळ ही दोन उपकरणे आपली आयुधे म्हणून का निवडली असावीत, असा साधा प्रश्नही आपल्या मनात उमटत नाही. एक तर, कृष्णाच्या लीलालाघवाच्या प्रभावळीत बलरामाचे व्यक्तित्व आणि कर्तृत्व नाही म्हटले तरी झाकोळलेलेच आहे. मात्र, त्याच बलरामाचे अगदी आगळेवेगळे आकलन या अंकात सादर केलेले आहे ते, मराठी लोकव्यवहाराचे व्यासंगी अभ्यासक-संशोधक डॉ. सदानंद मोरे यांनी. कृषिसंस्कृतीचा अग्रदूत हे बलरामाचे आजवर अभावानेच प्रतीत झालेले रूप आपल्या पुढ्यात उभे करणारे डॉ. मोरे यांचे या अंकात सादर केलेले विश्लेषण आपल्या परंपरेचे, पौराणिक साहित्यसंभाराचे आणि पूर्वकालीन व्यक्तिमत्त्वांबाबत आपण आजवर जपलेल्या धारणांचे एका अनोख्या अंगाने आकलन घडवेल, असा विश्वास वाटतो. *(कृपया पृष्ठ २९ पाहावे)*

## वाचकांना विनंती

'अर्थबोधपत्रिके'चा अंक दर महिन्याच्या १०तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी - 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेत - स्थळावर उपलब्ध आहेत. संकेतस्थळाला वाचकांनी अवश्य भेट द्यावी. www.ispepune.org.in**

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

संरक्षण

# संरक्षणसिद्धता हे प्रत्येकच नागरिकाचे कर्तव्य!

सुरक्षितता आणि समृद्धी यांचे अन्योन्य असे नाते असते. ते एकमेकांवर निर्भर असतात. देशाच्या सीमा सुरक्षित असल्याखेरीज देश सर्वार्थाने समृद्ध होऊ शकत नाही. देश समृद्ध होताना आत्मनिर्भरता आणि संरक्षणसिद्धता हे दोन विषय सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्वाधिक मोलाचे असतात. राष्ट्रीय सुरक्षितततेविषयी आपण जेव्हा विचार करतो, तेव्हा केवळ लष्करी दले अथवा राजकीय नेतृत्वापुरता तो विषय मर्यादित नसतो. प्रत्येक भारतीयाचे राष्ट्रीय सुरक्षेप्रती असलेले उत्तरदायित्व तितकेच मोलाचे ठरते, हे आपण लक्षात घ्यायला हवे. त्या मुळेच, राष्ट्रीय सुरक्षेचा विचार करीत असताना त्याला विविध आयाम आहेत हे सर्वप्रथम लक्षात घेतले पाहिजे. देशाच्या सीमांची सुरक्षितता जशी महत्त्वाची तशीच आणि तितकीच बाह्य सुरक्षा, अंतर्गत सुरक्षा आणि अपारंपरिक सुरक्षादेखील महत्त्वाची. प्रत्येक भारतीय नागरिकाने राष्ट्रीय सुरक्षिततेच्याबाबतीत सजगपणे सक्रिय योगदान दिले तर, जगातील एक बलाढ्य राष्ट्र म्हणून आपला देश निःसंशयपणे ओळखला जाईल.

देशाच्या संरक्षणाचा विचार करीत असताना देशाच्या सीमा आणि देशाचे प्रभावक्षेत्र (फ्राँटियर्स) यांच्यातील फरकसुद्धा लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. देशाच्या सीमा या प्रत्यक्ष जमिनीवर असतात. त्या नकाशाच्या

---

**विश्व मराठी परिषद आणि शिवसंघ प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने दुबई येथे आठवे विश्व मराठी साहित्य संमेलन अलीकडेच आयोजित करण्यात आले होते. 'संरक्षण आणि साहित्य' या मध्यवर्ती सूत्राभोवती या संमेलनाच्या अंतरंगाची गुंफण केलेली होती. त्यालाच अनुसरून, एअर मार्शल (निवृत्त) भूषण गोखले यांनी या साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषवावे, हे सर्वार्थाने उचित ठरले. त्यांच्या अध्यक्षीय भाषणाचा हा संपादित अंश 'अर्थबोधपत्रिके'च्या वाचकांसाठी आवर्जून सादर करत आहोत.**



माध्यमातून पाहता येतात. परंतु, देशाच्या भौगोलिक सीमांच्या पलीकडे जे अदृश्य स्वरूपात अस्तित्वात असते त्याला, लष्कराच्या परिभाषेत, त्या त्या देशाचे प्रभावक्षेत्र असे संबोधले जाते. असे हे प्रभावक्षेत्र वाढवत नेण्याचा प्रयत्न प्रत्येकच देश करीत असतो. भारताच्या प्रभावक्षेत्राबद्दल बोलायचे झाले तर पूर्वेला मलाक्का, पश्चिमेला लाल समुद्र, उत्तरेला मध्य आशिया आणि दक्षिणेला हिंद महासागरापलीकडे अंटार्क्टिक सामुद्रिक क्षेत्राचा या प्रभावक्षेत्रात समावेश होतो. देशाचे प्रभावक्षेत्र उत्तरोत्तर विस्तारित नेणे हे कोणत्याही देशाच्या सामर्थ्याचे खरे लक्षण असते. परदेशस्थ अनिवासी भारतीयसुद्धा भारताचे हे प्रभावक्षेत्र विस्तारण्यामध्ये योगदान देऊ शकतात.

इतिहासाचा धांडोळा घेऊन सांगायचे झाले तर, सामरिक सुरक्षेबाबत छत्रपती शिवाजीमहाराजांकडे विलक्षण दूरदृष्टी होती. त्यांचे समुद्रावर बारकाईने लक्ष होते. मात्र, नंतरच्या काळात सागरी सीमांकडे अक्षम्य दुर्लक्ष झाले. त्याचेच परिणाम आज भोगावे लागत आहेत. आपल्या शेजारी देशांपैकी चीन हिंद महासागरात आक्रमक बनतो आहे. संधी मिळेल तिथे सागरी तळ वसवताना तो दिसतो. भारताने मात्र सागरी सीमांचे रक्षण योग्य रीतीने केलेले नाही, ही वस्तुस्थिती नाकारता येण्याजोगी नाही.

आपल्या देशाचा भूगोल आणि इतिहास विविध टप्प्यांवर बदलत राहिला आहे. त्या साठी स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या इतिहासाची काही पाने पुन्हा एकवार चाळून पाहावी लागतील. एक स्वतंत्र देश या नात्याने फाळणीद्वारे पाकिस्तान अस्तित्वात आला. भारताला स्वातंत्र्य मिळून जेमतेम दहा आठवडे झाले होते. देशामध्ये असलेल्या वेगवेगळ्या संस्थानिकांमध्ये करार सुरू होते. संस्थानांचे विलिनीकरण सरदार पटेलांनी घडवून आणलेले असले तरी, हैद्राबाद, जुनागढ आणि जम्मू काश्मीर ही तीन संस्थाने भारतात तोवर समाविष्ट झालेली नव्हती. त्या संदर्भात वाटाघाटी चालू होत्या. फाळणीदरम्यान असंख्य लोक मारले जात होते. बेघर होत होते. त्या सा-या अस्थिरतेचा फायदा घेऊन काश्मीर खो-यात पाकिस्तानचे छुपे पाठबळ लाभलेल्या टोळीवाल्यांनी अचानक घुसखोरी केली. श्रीनगरपासून अवघ्या २० किलोमीटर अंतरावर ते पोहोचले. अखेर, २६ ऑक्टोबर १९४७ रोजी काश्मीरचे महाराजा हरिसिंग यांनी भारतात समाविष्ट होण्यास

संमती दर्शवून संबंधित करारावर स्वाक्षरी केली. त्याच रात्री भारतीय हवाई दलाच्या विमानांनी दिल्लीहून श्रीनगरच्या दिशेने झेप घेतली. भारतीय सेनेने घुसखोर टोळीवाल्यांना नुसते थोपवलेच नाही तर त्यांना पूर्णपणे मागे रेटले. संपूर्ण जम्मू-काश्मीर ताब्यात घेण्याची क्षमता भारतीय लष्करात असतानाही अचानक युद्धविराम घोषित करण्यात झाला. त्या गुंत्याची सोडवणूक करण्यासाठी भारतानेच संयुक्त राष्ट्रसंघाकडे धाव घेतली. त्याचीच परिणती म्हणजे काश्मीरचा एक तृतीयांश भाग आजही पाकिस्तानकडे आहे. त्यालाच 'पाकव्याप्त काश्मीर' असे आज म्हटले जाते. स्वतंत्र भारतानंतरचा इतिहास आणि भूगोल पहिल्यांदा बदलला तो असा.

भारताल स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी दोनच वर्षे दुसरे महायुद्ध संपलेले होते. महायुद्धातील हानी, हाहाकार आणि त्याचे दुष्परिणाम जगाने पाहिले होते. तरीही, सर्वांगीण सुरक्षेकडे आपण म्हणावे तसे लक्ष दिले नाही, असे म्हणणे क्रमप्राप्त ठरते. त्या काळी पाकिस्तानबरोबर झडलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर केवळ पाकिस्तानवरच लक्ष केंद्रित केले गेले. चीनच्या छुप्या मनसुब्यांकडे आपण निव्वळ डोळेझाक केली. परराष्ट्र धोरणातही चीनकडे ज्या गांभीर्याने पाहायला हवे होते तसे बघितले गेले नाही. १९५० साली चीनने तिबेटवर आक्रमण केले तेव्हाच खरे तर चीनचा आक्रमक पवित्रा ओळखून भारताने सावध व्हायला हवे होते. खरे तर, तिबेट भारताच्या प्रभावक्षेत्राखाली येत होते. मात्र तरीही, चीनने तिबेटवर मिळवलेला कब्जा भारताने मान्य केला. त्याच्याच जोडीने ईशान्य भारताच्या सुरक्षेकडेही अक्षम्य दुर्लक्ष झाले. १९६२ मध्ये चीनने भारतावर आक्रमण करून युद्ध अक्षरशः लादले. अरुणाचल प्रदेशाच्या डोंगराळ भागातून आगेकूच करत चिनी सैन्य तेजपूरपर्यंत पोहोचले. चिनी हल्ल्याचा प्रतिकार करण्यासाठी भारतीय हवाई दलाचा वापरच तेव्हा केला गेला नाही. काश्मीरातील टोळीवाल्यांना प्रतिकार करण्यासाठी भारतीय हवाई दलाचा वापर करण्याची जी तत्परता भारताने त्या वेळी दाखवली होती ती चिनी आक्रमणाच्या वेळी मात्र दाखवली गेली नाही. जोवर युद्ध शत्रूच्या भूमीवर लढले जात नाही तोवर कोणालाही ते जिंकताच येत नाही, या युद्धशास्त्रातील अगदी प्राथमिक सूत्राचा तेव्हा आपल्याला विसर पडला.



खरे तर, त्या परिस्थितीत हवाई दलाचा वापर करणे शक्य होते. कारण, उत्तर कोरियातील कम्युनिस्ट राजवटीची तळी उचलत उत्तर आणि दक्षिण कोरियादरम्यानच्या ज्या संघर्षात चीन उतरला होता ती लढाई संपलेली होती. चीनचे हवाईदल तितकेसे सक्षम नव्हते. सोव्हिएत युनियनबरोबरचे चीनचे संबंध ताणले गेलेले होते. क्यूबामधील प्रक्षेपणास्त्रांच्या समस्येकडे अवघ्या जगाचे लक्ष वेधलेले होते. इतके असतानाही, केवळ प्रतिकाराच्या भयगंडाने भारताने अधिक आक्रमक पाऊल उचलले नाही. या आघाडीवर लढाई करण्यासाठी आपला देश त्या वेळी सुसज्जच नव्हता. ऐन थंडीत लढण्यासाठी सैनिकांना आवश्यक सुविधासुद्धा प्राप्त झाल्या नाहीत. चिनी सैनिक तेजपूरपर्यंत आले त्याच वेळी हवाईदलाचा प्रभावी वापर केला गेला असता तर चिनी सैनिकांना मागे फिरताच आले नसते. डोंगरांतील खिंडींच्या चिंचोळ्या रस्त्यांवर बॉम्ब टाकले असते तर दरडी कोसळून असंख्य चिनी सैनिक युद्धकैदी झाले असते. परंतु तसे न झाल्याने स्वतंत्र भारताचा इतिहास आणि भूगोल दुसऱ्यांदा बदलला.

चिनी आक्रमणानंतर यशवंतराव चव्हाण यांच्याकडे संरक्षणमंत्रीपदाची धुरा आली. त्यांनी उच्चस्तरीय नेतृत्वामध्ये सर्वप्रथम समन्वय घडवून आणला. राजकीय नेतृत्व, उच्चतम सनदी अधिकारी आणि लष्कर यांच्यातील परस्परसंवाद वाढवला. त्यांच्या संयुक्त बैठका घेण्यास सुरुवात केली. यशवंतराव चव्हाण यांच्या स्पष्टवक्तेपणामुळे अनेक गैरसमजुती दूर होण्यास मदत झाली. त्याचा एक चांगला परिणाम असा झाला की १९६२च्या युद्धामुळे खचलेल्या सैन्याचा आत्मविश्वास पुन्हा बळकट होऊ लागला. यशवंतरावांनी युद्धसाहित्याच्या खरेदीला प्रोत्साहन दिले. लष्करी व्यवस्था सुधारण्याला त्यांतून गती मिळाली. पुढे, पंडित नेहरू यांच्या निधनांनंतर १९६४ साली पंतप्रधान झालेल्या लालबहादूर शास्त्री यांच्या काळात एक वेगळाच भारत या सगळ्यांद्वारे आकार घेऊ लागला. त्या संधिकाळाचा लाभ उठवण्याची बुद्धी पाकिस्तानी नेतृत्वाला झाली. १९६५च्या युद्धापूर्वी कच्छच्या रणामध्ये पाकिस्तानने लुडबूड केलेली होतीच. ब्रिटिश पंतप्रधान विल्सन यांनी घडवून आणलेल्या समझोत्यामुळे सुमारे ९०० चौरस किलोमीटरचा भूभाग त्या वेळी पाकिस्तानला द्यावा लागलेला होता.

देशाचा इतिहास आणि भूगोल काही प्रमाणात बदलण्याची ही झाली तिसरी घटना. इतके होऊ नही पाकिस्तानने १९६५मध्ये भारतावर हल्ला केला. ‘ऑपरेशन जिब्राल्टर’ या नावाने मोहीम हाती घेऊ न २० हजार सैनिक पाकिस्तानने काश्मीरमध्ये घुसवले. १४ ऑगस्ट रोजी - म्हणजे - पाकिस्तानच्या स्थापनादिनी श्रीनगरमध्ये ध्वजारोहण करण्याचे पाकिस्तानी नेतृत्वाचे मनसुबे होते. पाकिस्तानचे तत्कालीन अध्वर्यू आयुबखान यांचा मुलगा गोहर आयुबखान यांनी लिहिलेल्या पुस्तकात याचा संदर्भ दिलेला आहे. पाकिस्तानचे त्या वेळचे परराष्ट्रमंत्री झुल्फिकार अली भुट्टो यांनी आपल्या वडिलांना कसे फसवले याचा इतिहास त्या पुस्तकात नमूद आहे. १४ ऑगस्ट रोजी श्रीनगरमध्ये पाकिस्तानचा झेंडा फडकवू आणि ८ सप्टेंबरला दिल्लीच्या लाल किल्ल्यात रात्रीचे भोजन घेऊ, असे भुट्टो यांचे स्वप्नरंजन होते. परंतु, काश्मीरातील शूर नागरिकांनी भारतीय लष्कर आणि पोलिस यांना मदत केली. आंतरराष्ट्रीय कायद्याचे आपण नको इतके आज्ञाधारक पालनकर्ते आहोत. त्यामुळे काश्मीर खो-यात इतकी गंभीर परिस्थिती असतानाही हवाईदलाचा तळसुद्धा भारत वापरत नव्हता. पाकिस्तानातून होत असलेल्या घुसखोरीच्या बित्तंबातम्या आपल्याला काश्मीरातील जनतेमुळे मिळाल्या. त्यामुळे त्या घुसखोरांना पिटाळण्यात भारतीय लष्कराला यश आले. पाकिस्तानचा हा हल्ला मात्र यशस्वी झाला नाही. त्या नंतर पाकिस्तानने छांब क्षेत्रात आक्रमण केले. त्या वेळी संरक्षणमंत्री असलेल्या यशवंतराव चव्हाण यांनी तातडीने हवाई दलाचा वापर करण्याची परवानगी दिली. खरे तर त्या वेळी त्यांचे पंतप्रधानांशी बोलणेही होऊ शकलेले नव्हते, तरीही, प्रसंगाचे गांभीर्य आणि तत्क्षणी निर्णय घेण्याची निकड लक्षात घेऊ न हवाई दलाचा वापर करण्याची परवानगी त्यांनी दिली. भारतीय हवाई दलाने पाकिस्तानी सैन्याला पिटाळून लावले. मात्र, भारतीय सैन्य लाहोरपासून अवघ्या २० किलोमीटर अंतरावर असतानाच नेमका युद्धविराम घोषित करण्यात आला.

युद्धादरम्यान परिणामकारक निर्णयांच्याबाबतीत जी तत्परता भारताने १९४७ च्या आणि १९६५च्या युद्धांत दाखवली त्यामुळेच त्या संघर्षात भारताला बाजी मारता आली. १९६५च्या युद्धात भारताने हाजीपीर



खिंडीपर्यंतचा भाग जिंकलेला होता. परंतु, १९६६साली झालेल्या ताश्कंद कराराद्वारे तो सगळा जिंकलेला भूभाग पाकिस्तानला परत देण्यात आला. युद्धाइतक्याच महत्वाच्या असतात त्या युद्धविरामानंतर होणा-या वाटाघाटी. युद्ध करणे जसे महत्त्वाचे तसेच युद्ध योग्य रीतीने संपवणेही तितकेच महत्वाचे असते. त्यासाठी सशस्त्र दले करत असलेल्या सूचना लक्षात घेणे आवश्यक असते. युद्ध हे केवळ लढण्यासाठी कधीही नसते तर ते जिंकण्यासाठीच करायचे असते. युद्धात कधीही उपविजेता नसतो. तिथे जय अथवा पराजय या दोनच गोष्टी असतात.

पाकिस्तानबरोबर १९७१ साली झडलेले युद्ध लढताना १९६५च्या युद्धातील विजयाचे भक्कम मनोबल भारतीय सैन्याला लाभलेले होते. विजयाची अशी मानसिकता आणि सकारात्मक दृष्टिकोन या दोन बाबी सैन्याचे मनोबल उंचावण्यासाठी फार उपयुक्त ठरत असतात. लष्कराला ‘संरक्षण दल’ असे न म्हणता त्याला ‘सशस्त्र दल’ असे संबोधायचे ते त्यासाठीच. भारताने कधीही स्वतःहून दुस-या देशावर आक्रमण केलेले नाही. परंतु म्हणून, आपल्यावर उठसूठ कुणीही आक्रमण करावे आणि आपण त्याचा केवळ प्रतिकार करीत ते थोपवत राहावे, असा मात्र याचा अर्थ अजिबातच नाही. भारत आत्मनिर्भर आहे, सक्षम आहे. सशस्त्र आहे, आत्मविश्वासाने सळसळणारा आहे... अशी जरब सगळ्यांनाच बसायला हवी. त्यासाठी तसा दराराही निर्माण व्हायला हवा. पाकिस्तानविरु द्धचे १९७१साली झालेले युद्ध हे अनेक परींनी एक आदर्श उदाहरण ठरावे. अवघ्या १४ दिवसांमध्ये ढाका पडले आणि पाकिस्तानने शरणागती पत्करली. या यशात भारताच्या तीनही दलांचा मोठा वाटा आहे. त्या युद्धाद्वारे, १९४७ नंतर पहिल्यांदाच आपल्याला अनुकूल असा इतिहास आणि भूगोल घडला. बांगला देश हा एक नवीन देश त्यांतून जन्माला आला. पाकिस्तानच्या निर्मितीपासून सुरू असलेली ‘टू नेशन थिअरी’ त्या युद्धाद्वारे संपुष्टात आली. युद्ध करायचे कसे आणि थांबवायचे कसे याचा ते युद्ध म्हणजे आदर्श असा वस्तुपाठ ठरला. १९७१च्या युद्धात केवळ लष्करच लढले नाही तर प्रत्येक भारतीयच जणू लढला. समाजाच्या सर्वच स्तरांतून त्या वेळी मिळालेली मदत, स्फूर्ती आणि प्रोत्साहन केवळ अवर्णनीयच होय.

सियाचीनवर भारताने ताबा मिळवला १९८४ साली. चीनशी हातमिळवणी करायला त्या वेळी पाकिस्तानने सुरुवात केलेली होती. तेव्हा आपण तत्परतेने पावले उचलली. त्यामुळे आज सियाचीनमध्ये भारतीय लष्कर ठामपणे पाय रोवून उभे आहे. जनरल कयानी हे पाकिस्तानचे लष्करप्रमुख असताना सियाचीन परिसरामध्ये पाकिस्तानचे २८ सैनिक एका चकमकीत मारले गेले. त्या वेळी, सियाचीन प्रश्नामुळे भारत आणि पाकिस्तान अशा उभयतांची खूप मोठी हानी होते आहे, असा कांगावा पाकिस्तानने चालू केला. तेव्हा, सियाचीनच्या प्रदेशाला एक तटस्थ भूप्रदेश म्हणून उभयतांनी मान्यता दिल्यास दोन्हीकडच्या खर्चातही बचत होईल आणि मनुष्यबळाची हानीही कमी होऊ शकेल, असा प्रस्ताव जनरल कयानी यांनी मांडला. सियाचीनमध्ये गुलाबाची बाग दोन्ही देशांनी मिळून साकारावी, अशीही एक कल्पना त्यांनी मांडली.

तिबेटी भाषेमध्ये 'सियाचीन' या शब्दाचा अर्थच मुळाच 'गुलाबाच्या फुलांची दरी' असा होतो. त्यामुळे कयानी यांनी ही कल्पना सुचवली असावी. परंतु, अशा बाबींमध्ये वरपांगी भावनेपेक्षा द्रष्टेपण अधिक महत्त्वाचे ठरते. कयानी यांनी मोठ्या धूर्तपणे पुढे केलेले खर्चाचे आणि मनुष्यहानीचे कारण वरकरणी कितीही योग्य वाटत असले तरी केवळ तत्कालीन परिस्थितीच्या चौकटीत जमा-खर्चाचा हिशोब मांडून निर्णय घेण्यापेक्षा, भविष्याचा नेमकेपणाने वेध घेऊन व्यूहरचना करण्याचा प्रगल्भ धोरणीपणा आंतरराष्ट्रीय व्यवहारांत दाखवावा लागतो. सियाचीनच्याबाबतीत असेच दूरदृष्टीचे धोरण अपेक्षित आहे. कारण आपण हा भूभाग मोठ्या कष्टाने आणि प्रयत्नांनी परत मिळवलेला आहे. नळांद्वारे गॅस पुरविण्याची यंत्रणा, केरोसीनच्या पुरवठ्याची केंद्रे, फायबर ऑप्टिकसारख्या सुविधा... अशा अनेक सुधारणा आता तिथे करण्यात आलेल्या आहेत. थंडीपासून सैनिकांचे संरक्षण करणारे विशिष्ट प्रकारचे कपडे, बर्फात चालू शकतील अशी वाहने आपल्याकडे आता आलेली आहेत. संरक्षणाच्या दृष्टीने विचार करायचा झाला तर आपण उंचावर आहोत. पाकिस्तान मात्र खाली आहेत. त्यामुळे, इतकी मोक्याची जागा हातची दवडण्यात अजिबातच हशील नाही.



त्यांतच, कुरापती काढण्यासंदर्भातील पाकिस्तानचा इतिहास जगाला ज्ञात असल्याने त्या देशावर भरवसा ठेवण्यातही अर्थ नाही. आज तिथे ते काही कारवाया करीत नाहीत म्हणजे, उद्या करणारच नाहीत याची काहीही खात्री देता येत नाही. त्यामुळे, जमा-खर्चाचा ठोकळेबाज ताळेबंद मांडून कोणतेही चुकीचे पाऊल उचलले न जाता सियाचीनबाबतचे धोरण विचारपूर्वकच आखले जाणे आवश्यक आहे. सियाचीनच्या मुद्याबाबत आपली भूमिका ठाम असणेच गरजेचे आहे. भारताच्या आणि विशेषतः या देशातील तरुणांच्या दृष्टीने महत्त्वाचे म्हणजे, सियाचीनमध्ये प्रचंड प्रमाणावर खनिजे मिळण्याची दाट शक्यता. काराकोरमच्या पर्वतरांगा पुढे अफगाणिस्तानला मिळतात त्या याच प्रदेशातून. तिथे मोठ्या प्रमाणावर खनिजद्रव्ये मिळू शकतात. अफगाणिस्तानमध्ये जसे सिलिकॉन मिळाले आहे तसेच भविष्यात आपल्याला ते सियाचीन परिसरात मिळू शकण्याची शक्यता आहे. तसेच, भविष्यात या परिसरात ऊर्जानिर्मितीही मोठ्या प्रमाणावर होऊ शकेल. संरक्षण आणि धोरणात्मक दृष्टीने विचार केला तर सियाचीन आपल्याकडे राहणे सर्वच दृष्टींनी महत्त्वाचे आहे. म्हणूनच सियाचीनबाबतचे धोरण विचारपूर्वकच आखले गेले पाहिजे.

सुरक्षिततेबाबत भारत आता अधिक सजग, सतर्क झालेला आहे. अगदी अलीकडचे डोकलाम प्रकरण म्हणजे आपल्या देशाची राजनीती, विदेशनीती आणि लष्करी भूमिका यांच्या समन्वयाचे उत्तम उदाहरण ठरावे. येणा-या काळात सायबर सुरक्षेबाबत आपल्याला खूप दक्ष राहावे लागणार आहे. वाढत्या दहशतवादाचे एक मोठे आव्हान देशापुढे आहेच. आपल्या गुप्तहेरखात्याची जबाबदारी त्यात फार मोठी आहे. कारण, गुप्तचर सूत्रांकडून मिळालेली माहिती पुढील कार्यवाहीसाठी सुरक्षा यंत्रणांना नेमक्या वेळेत आणि अचूकपणे दिली जाणे देणे आवश्यक ठरते. तसे झाले नाही तर त्याची मोठी किंमत मोजावी लागल्याची उदाहरणे आपल्याकडे आहेत. मुंबईमध्ये २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यासारख्या घटनेद्वारे अंतर्गत सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला. पठाणकोटमधील घटनेतही गुप्तहेरखात्याकडून अचूक माहिती मिळण्याचा अभाव होता. कारगीलमध्येही पाकिस्तानच्या सैनिकांनी अशीच घुसखोरी केलेली होती.

तत्परतेने माहिती मिळण्यासाठी गुप्तहेर खाते अत्यंत सर्तक, अद्ययावत, नव्या आयुधांसह २४ तास सज्ज असणे आवश्यक आहे. सुरक्षायंत्रणा, गुप्तहेर खाते, अधिकारी वर्ग आणि राजकीय नेतृत्व यांच्यामध्ये उत्तम समन्वय प्रस्थापित असणे ही काळाची गरज आहे. भविष्यात काय होऊ शकते याची अद्ययावत व अचूक माहिती गुप्तहेर यंत्रणांकडून आपल्याला प्राप्त होणे गरजेचे आहे. यालाच 'प्रेडिक्टिव्ह इन्टेलिजन्स' असे म्हटले जाते. दहशतवादी घटना घडून गेल्यानंतर चुकांची दुरुस्ती करत बसण्यापेक्षा दहशतवाद रोखायचा असेल तर आपण अत्यंत सतर्क असणे गरजेचे आहे.

या सर्व प्रवासात प्रत्येक नागरिकाने राष्ट्रीय सुरक्षेबाबत सजग, संवेदनशील राहणे या पुढे अनिवार्य बनणार आहे. या प्रक्रियेमध्ये उत्तम साहित्य निश्चितपणे चांगले योगदान देऊ शकते. आजमितीला अशा साहित्याचे मराठीत प्रमाण अत्यल्प आहे, ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. त्याची मोठी खंतही वाटते. राष्ट्रीय सुरक्षा अग्रस्थानी असायला हवी, हा विचारसुद्धा साहित्यातूनच समाजमनावर रुजवावा लागेल. जगभरातील विविध देशांमध्ये संरक्षणविषयक साहित्याची निर्मिती विपुल प्रमाणावर होताना दिसते. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, जगभरातील प्रमुख लष्करांच्या इतिहासाची साक्षेपी मांडणी त्यांच्या अधिकृत दस्तऐवजांचा आधार घेऊनच सिद्ध केली जाते. त्या आधारभूत सामग्रीच्या आधारे विपुल साहित्यनिर्मिती होत जाते. काहीजण त्यातूनच कल्पनाविस्तार करून भविष्याचा वेध घेणारी पुस्तके लिहितात. याचे अगदी ताजे उदाहरण म्हणजे अमेरिकेचे माजी अध्यक्ष बिल क्लिंटन यांनी सायबर युद्धांवर आधारित एका पुस्तकाचे स्वतः लेखन केलेले आहे. 'प्रेसिडेंट इज मिसिंग' असे त्याचे नाव.

आपल्याकडे अशा साहित्याचा मात्र अभाव आहे. नाही म्हणायला काही मौलिक उदाहरणे हाताशी आहेत. ईशान शर्मा या पंजाब विद्यापीठातील एका लेखकाने १९६५च्या युद्धावर लिहिलेले पुस्तक अतिशय अभ्यासपूर्ण आहे. संरक्षणविषयक वाङ्मयनिर्मिती करीत असताना संबंधित साहित्यिक, लेखक यांना खूप अभ्यास करावा लागतो. अचूक संदर्भ, घटना व घडामोडींचे नेमके वास्तव समोर येण्यासाठी, प्रसंगी, प्रत्यक्ष मुलाखती घेण्याचा पर्यायही अंगीकारावा लागतो. त्यामुळे ती तशी दमवणारी प्रक्रिया असते. परिणामी,



लेखक त्या वाटेने जाताना फारसे दिसत नाहीत. अशा प्रकारच्या लेखनात तांत्रिक संदर्भ अधिककरून येत असल्याने मराठी लेखक अनुवादांकडे अभावानेच वळताना दिसतात. माधव गोखले यांनी व्ही. पी. मलिक यांच्या पुस्तकांचा अनुवाद केला आहे. निवृत्त मेजर जनरल शशिकांत पित्रे यांनी १९६२च्या युद्धावर आधारित पुस्तक लिहिलेले आहे. परंतु ही अशी उदाहरणे मोजकीच. इंग्रजीतून प्रकाशित होणा-या संरक्षणविषयक साहित्यात मात्र संशोधन करून तटस्थपणे अभ्यास मांडत ऐतिहासिक घटनांची नेमकी नोंद केलेली दिसते. मराठी साहित्यात याचा अभाव दिसतो. संरक्षणदलातील चांगले अधिकारी, पत्रकार आणि संरक्षणविषयक अभ्यास करणारे तरूण संशोधक यांनी पुढाकार घेऊन संरक्षणविषयक साहित्यात मोलाचे योगदान द्यायला हवे. एकीकडे देश संरक्षणसिद्धतेत समर्थ होत असताना साहित्याच्या माध्यमातून ते सारे स्थित्यंतर समाजासमोर येणे व त्यातून राष्ट्रीय सुरक्षिततेबाबत एकूणच समाजाचे मनोबल उंचावणे गरजेचे आहे.

अनिवासी भारतीयांनीसुद्धा देशाच्या उभारणीत आपल्या विचारांचे आणि प्रत्यक्ष कृतीचे योगदान देणे गरजेचे आहे. भारताच्या संदर्भात दोन तीन गोष्टी अनिवासी भारतीय करू शकतात. अनिवासी भारतीयांनी हेरगिरी करावी अशी अपेक्षा नाही. परंतु ते ज्या देशात राहतात तेथील ज्ञान ते निश्चितपणे हस्तांतरित करू शकतात. गुंतवणूक करण्याची क्षमता असणा-या अनिवासी भारतीयांनी लघु व मध्यम उद्योगांना पाठबळ देणे गरजेचे आहे. त्यातून ते देशाबाहेर राहूनदेखील राष्ट्रउभारणीच्या कामात योगदान देऊ शकतात. जगातील सर्वाधिक तरूण लोकशाही असा भारताचा लौकिक २०२० सालादरम्यान प्रस्थापित होईल. तेव्हा, जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात तरूणांची उमेद कशी वाढेल, त्यांना नव्या संधी कशा प्राप्त होतील आणि त्याद्वारे आपल्या देशाची सर्वांगीण प्रगती कशी होईल याचा विचार देशातील प्रत्येकाने केला पाहिजे. त्या दृष्टीकोनातून एका समर्थ, सशस्त्र आणि आत्मनिर्भर देशाचे चित्र या तरूण पिढीसमोर साकारायला हवे. साहित्य आणि वाङ्मयनिर्मितीद्वारे असे चित्र अधिक उत्तम रीतीने समूर्त होऊ शकेल. या वैचारिक प्रक्रियेमध्ये सर्वच जण या भूमिकेतून आपापले उत्तम योगदान देतील, असा विश्वास मला वाटतो. ■■

शेती

# भरड धान्यांना पुन्हा सुगीचे दिवस

सर्वसामान्य भारतीयाच्या आहारविषयक सवयींमध्ये अलीकडील काळात लक्षणीय असे गुणात्मक बदल घडून येताना दिसतात. १९९०च्या दशकापासून भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये गतिमान बनलेल्या आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाद्वारे भारतीय समाजाच्या विविध स्तरांत वेगवेगळ्या प्रमाणात आणि निरनिराळ्या मात्रेने झिरपलेल्या नवसुबत्तेचा आहारविषयक आवडीनिवडी, सवयी आणि आकृतिबंध यांत साकारत असलेल्या या बदलांशी संबंध पोहोचतो. आपल्या देशात राष्ट्रीय नमुना पाहणी संघटनेच्या माध्यमातून वेळोवेळी आयोजिण्यात येत असलेल्या देशातील सर्वसाधारण कुटुंबांच्या खर्चविषयक बाबींसंदर्भात जी आकडेवारी संकलित करण्यात येते तिच्यामध्ये या बदलाचे स्पष्ट प्रतिबिंब उमटताना दिसते. देशातील नागरीकरणाच्या सरासरी पातळीमध्ये घडून येत असलेल्या वेगवान वाढीचाही संबंध आहारातील बदलांशी पोहोचताना दिसतो. दरडोई सरासरी उत्पन्नामध्ये घडून येत असलेली वाढ, विविध प्रकारच्या माध्यमांचा वाढता पसारा आणि झपाट्याने हातपाय पसरणारे नागरीकरण यांच्या एकत्रित परिणामाद्वारे समाजाच्या विशेषतः नागर समूहांच्या आहाराचा आकृतिबंध लक्षणीयरीत्या बदलतो आहे. अन्नधान्यांवर अशा कुटुंबांमधून केल्या जाणा-या सरासरी खर्चामध्ये तृणधान्यांवर होणा-या सरासरी खर्चाचे प्रमाण अलीकडील काळात घसरताना दिसते. तृणधान्यांच्या जागी दूधदुभते, फळफळावळ, भाजीपाला, कडधान्ये, मटन व अन्य मांसजन्य जिनसा...यांसारख्या प्रथिनयुक्त खाद्यघटकांचा समावेश प्रकर्षाने होताना दिसतो. त्याच वेळी, बदलत्या जीवनशैलीमुळे पसरणा-या व्याधींसंदर्भातील जागरूकता दुसरीकडे सरासरीने वाढीस लागते आहे. परिणामी, आहारातील विविधतेबरोबरच अन्नघटकांमधील पोषणमूल्यांबाबतची संवेदनशीलताही वेगाने वाढते-पसरते आहे. गहू व तांदळासारख्या मुख्य तृणधान्यांच्या जागी ज्वारी-बाजरीसारख्या दुय्यम तृणधान्यांचा समावेश अलीकडील काळात जाणीवपूर्वक केला जाताना दिसतो, तो त्या जागरु कतेपायीच.



साहजिकच, बाजरी, ज्वारी, नाचणी, वरई यांसारख्या भरड धान्यांना अलीकडे पुन्हा चांगले दिवस येऊ लागले आहेत. १९६०च्या उत्तरार्धात आपल्या देशात घडून आलेल्या हरित क्रांतीच्या काळात गहू आणि भात या दोन तृणधान्य पिकांच्या उत्पादनवाढीवर भर देण्यात आला. देशाला अन्नधान्याबाबत स्वयंपूर्ण करण्यासाठी तो आवश्यकही होता. परंतु, याच काळात सरकार आणि शेतक-यांकडून भरड धान्यांकडे मात्र साफ दुर्लक्ष झाले. भरड धान्यांमधील पौष्टिक घटक आणि प्रतिकूल स्थितीतही टिकून राहण्याची त्यांची क्षमता यामुळे शेतकरी आता पुन्हा या धान्यांकडे वळू लागले आहेत. केंद्र सरकारने चालू वर्ष (म्हणजे २०१८) हे ‘राष्ट्रीय भरड धान्य वर्ष’ (National Year of Millets) म्हणून जाहीर केले आहे.

भरड धान्यांच्या गटाचा एकत्रित निर्देश ‘मिलेट्स’ असा केला जातो. ‘मिलेट्स’ म्हणजे बाजरी असा अर्थ व्यवहारात सरसहा घेतला जात असला तरी, प्रत्यक्षात ‘पर्ल मिलेट’ म्हणजे बाजरी. तर, ‘सोरघम’ म्हणजे ज्वारी. भरड धान्यांबाबत आताशा निर्माण होत असलेल्या कुतूहलपूर्ण आत्मीयतेपायी वरई वा हलवी वा सावा (लिटिल मिलेट), नाचणी अथवा नागली (फिंगर मिलेट), कांग अथवा राळ (फॉक्सटेल मिलेट), कोड्रा (कोडो मिलेट) अशा प्रकारच्या, लहान दाणा असलेल्या भरड धान्यांचा निर्देश तरी आपल्या आहारविश्वात होऊ लागलेला दिसतो. तसे बघितले तर, ‘मिलेट्स’ म्हणजे गहू, तांदूळ यासारखी तृणधान्येच होत. मात्र, गहू, तांदूळ ही मुख्य तृणधान्ये मानली जातात. त्यांचा समावेश भारतीयांच्या आहारात मोठ्या प्रमाणात असतो व पूर्वापार आहेही. त्यांचे उत्पादन व्यापारी तत्वावर घेतले जाते. या पिकांसाठी सिंचनाची व्यवस्था करावी लागते. ज्वारी, बाजरी वा इतर भरड धान्यांचा भारतीयांच्या आहारात समावेश असला तरी ती मुख्य धान्ये मानली जात नाहीत. गहू, तांदळाच्या तुलनेत त्यांचे व्यापारी उत्पादन नगण्य म्हणावे इतके कमी आहे. ही धान्ये कमी पाण्यात आणि भरड जमिनीत साधारणपणे घेतली जातात. यामुळे ‘भरड धान्ये’ म्हणूनच ती ओळखली जात असावीत.या धान्याच्या दाण्यांवर आवरण वा कवच असते. ते काढायला कठीण असते. भरड धान्ये आवरणासकट खायची पद्धत आपल्याकडे आहे.

या आवरणामुळे आपल्या आहारात तंतुमय पदार्थांचा समावेश होतो. भारतातील प्रत्येक प्रदेशात स्थानिक पातळीवर लोकप्रिय असे एक तरी भरड धान्य आहे. महाराष्ट्राच्या काही भागात नाचणी हे भरड धान्य चवीने खाल्ले जाते. मध्य प्रदेशात कोडो, कुटकी ही भरड धान्ये लोकांना आवडतात. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मिलेट्स रीसर्च (आयआयएमआर) ही केंद्र सरकारने १९५७मध्ये हैदराबाद येथे स्थापन केलेली संस्था भरड धान्यांविषयी संशोधन करते. अभ्यासकांच्या मते देशात अनेक प्रकारची भरड धान्ये घेतली जात असली तरी, भारतीयांच्या जेवणात ज्वारी, बाजरीसह आठ ते नऊ भरड धान्येच काय ती मुख्यत्वेकरून आढळून येतात. देशातील १३ प्रमुख भरड धान्यांसंबंधी सध्या 'आयआयएमआर' ही संस्था संशोधन करते आहे. या संस्थेची दोन प्रादेशिक संशोधन केंद्रे आहेत. त्यातील एक महाराष्ट्रात सोलापूर येथे तर दुसरे आंध्र प्रदेशातील वारंगल येथे आहे. सोलापूर येथील केंद्रात रब्बी ज्वारीवर संशोधन केले जाते. भरड धान्यांच्या उत्पादनासाठी उपयुक्त तंत्रज्ञान विकसित करणे, या धान्यांचे उत्पादन वाढवण्यासाठी आणि त्यांच्या विकासासाठी उपक्रम राबविणे हे 'आयआयएमआर' या संस्थेचे प्राथमिक उद्दिष्ट.

ओदिशा, आंध्र प्रदेश आणि तेलंगणा यासारख्या राज्यांनी भरड धान्यांच्या लागवडीला प्रोत्साहन देणारे उपक्रम सुरू केले आहेत. आंध्र प्रदेशात भरड धान्य लागवडीचा उपक्रम २०१६ सालातील फेब्रुवारी महिन्यापासून राबविला जातो आहे. तेलंगणात २ जुलै २०१८ पासून सहा जिल्ह्यांमधील २ हजार ९१३ हेक्टर जमिनीवर भरड धान्यांच्या विकासाचा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. आंध्र प्रदेश आणि मध्य प्रदेशात भरड धान्यांवर प्रक्रिया करणारी केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. मध्य प्रदेशात कोडो, कुटकी या स्थानिक भरड धान्यांच्या लागवडीला प्रोत्साहन दिले जाते आहे. भरड धान्यांचे उत्पादन घेणा-या शेतक-यांना या राज्यांच्या सरकारांकडून बियाण्यांचा पुरवठा करण्याबरोबरच लागवडीसाठी मार्गदर्शनही केले जाते. त्याच्याच जोडीने, भरड धान्यपिकांसाठी आकर्षक आधारभूत किमती जाहीर करण्याबरोबरच आधारभूत किमतींना ती धान्ये विकत घेण्याची सरकारी यंत्रणा निर्माण करण्याचे प्रयत्नही जारीने होत आहेत.



भरड धान्यांचे वैशिष्ट्य म्हणजे प्रामुख्याने महिलांकडून या पिकांची लागवड आणि जोपासना केली जाते. पिढ्यान्‌पिढ्या या धान्यांवरील प्रक्रिया शेतकरी कुटुंबांतील महिलाच करत आहेत. भरड धान्यांसाठीचे बियाणे राखून ठेवण्याची जबाबदारी त्याच पार पाडतात. त्यांचे हे कर्तृत्व मात्र आजवर ठळकपणे मांडले गेलेले नाही. भरड धान्यांची लागवड हे कष्टाचे काम आहे. या धान्यांवर प्रक्रिया करणे म्हणजे ही धान्ये सडणे, पाखडणे, साफ करणे. ही सारी कौशल्याचे कामे आहेत. शेतकरी कुटुंबांतील महिला लहानपणापासून ही कामे आई वा आजीकडून शिकतात. ओदिशासारख्या राज्यात आदिवासी महिला शेतक-यांमध्ये पिढ्यान्‌पिढ्या हे कौशल्य संक्रमित झालेले दिसते.

नागा जमातीच्या आहारात भरड धान्यांचा समावेश परंपरेने चालत आला आहे. भात आणि भरड धान्यांचे पदार्थ असे या जमातीच्या रोजच्या आहाराचे स्वरूप आहे. तांदूळ सडण्याच्या गिरण्या गावागावांमध्ये सुरू झाल्यामुळे सडलेले तांदूळ सहज उपलब्ध होऊ लागले आणि भरड धान्ये मागे पडली. परंतु, नागालँडमध्येही आता भरड धान्यांचे पुनरुज्जीवन होऊ लागले आहे. येथील रहिवासी कांग वा राळ (फॉक्स मिलेट) या भरड धान्यांचे पीक घेण्यास प्राधान्य देतात. भरड धान्यांचे उत्कृष्ठ उत्पादन घेणा-या शेतक-यांसाठी पुरस्कार जाहीर करणे, खास भरड धान्यांचा महोत्सव साजरा करणे...अशांसारख्या उपक्रमांचे आता नागालँडमध्ये पुनश्च एकवार उत्साहाने आयोजन केले जाताना दिसते. नागालँडमध्ये प्रामुख्याने महिलाच भरड धान्यांच्या लागवडीची जबाबदारी घेतात. या धान्याचे बियाणे जपून ठेवणे, मशागत करणे, लागवड आणि कापणी करणे अशी सर्व कामे त्या सहजपणे पार पाडतात. या धान्यांबाबत त्या जाणकार आहेत. भरड धान्यांच्या लागवडीवर लक्ष केंद्रीत करणे हा महिलांच्या सक्षमीकरणाचा एक मार्ग असू शकतो. त्या दृष्टीने, महिला शेतक-यांनी उत्पादन केलेल्या भरड धान्यपिकांना बाजारपेठ उपलब्ध व्हावी, भरड धान्यांच्या विक्रीद्वारे महिलांच्या गाठीशी चार पैसे जमा व्हावेत, यासाठी काही स्वयंसेवी संघटनाही तिथे कार्यरत बनत आहेत. या धान्यांवर प्रक्रिया करणे हे महिलांना कष्टप्रद ठरते.

ओदिशामध्ये आदिवासी जमातींचे लोकसंख्येतील प्रमाण ४० टक्के एवढे मोठे आहे. आदिवासी महिला भरड धान्ये घेण्यात तरबेज असतात. भातपिकाला प्रोत्साहन मिळाल्याने देशभरातच भरड धान्यांची लागवड मागे पडली. केंद्रीय कृषी खात्याच्या आकडेवारीनुसार हरित क्रांतीपूर्वी म्हणजे १९६५-६६ पूर्वी भरड धान्यांची लागवड ३ कोटी ६९ लाख हेक्टर क्षेत्रात केली जात होती. हे प्रमाण नंतरच्या वर्षांमध्ये खालावत गेले. २०१६-१७ या वर्षात देशातील या धान्याची लागवड १ कोटी ४७ लाख हेक्टर क्षेत्रापुरती मर्यादित झाली. दुसरीकडे भातपीक मुबलक प्रमाणात उपलब्ध झाले. भरड धान्यांच्या तुलनेत भातपिकावर प्रक्रिया करणे सुलभ असते. भातावर प्रक्रिया करण्याच्या म्हणजे तांदूळ सडण्याच्या यांत्रिक सुविधा गावोगावी तसेच शहरांमध्ये उपलब्ध आहेत. यामुळे भाताचे सेवन करण्याचे प्रमाण वाढले.

भरड धान्यांमधील पोषणमूल्यांबाबत अलीकडे जागृती वाढीस लागलेली असल्याने त्यांना असणारी मागणी वाढते आहे. त्याचप्रमाणे, या पिकांच्या लागवडीस पाणीही तुलनेने कमी प्रमाणात लागत असल्याने शेतकरी त्यांच्या लागवडीकडे पुन्हा वळत आहेत. हैदराबाद येथील 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ न्यूट्रिशन'' या संस्थेने नोंदविलेल्या संशोधनानुसार, रागी वा नाचणी (finger millet) या भरड धान्यात तांदळाच्या तुलनेत ३४ पटींनी अधिक कॅल्शियम, चौपटीपेक्षा जास्त लोह आणि १८ पटीने अधिक तंतू असतात. एक वाटी नाचणी आणि एक वाटी दूध यांची तुलना केली, तर नाचणीत दुधापेक्षा तिपटीने जास्त कॅल्शियम असते. नाचणी वा नागली हे भरड धान्य शरीरासाठी पौष्टिक मानले जाते. १०० ग्रॅम नाचणीत ३४४ मिलिग्रॅम इतक्या विपुल प्रमाणात कॅल्शियम असते. यामुळे खेळाडू, वाढत्या वयाची मुले यांना नाचणीपासून बनविलेले पदार्थ खाण्याचा सल्ला डॉक्टर देतात. नागली हे दुर्गम भागातील रहिवाशांचे प्रमुख अन्न आहे. सर्व प्रकारच्या जमिनीत ते येते. भरड धान्ये ही पचायला हलकी असतात. या धान्यांचे पदार्थ खाल्ल्याने पोट साफ राहते. ती पौष्टिक असल्याने प्रोटीन, सेरोटोनीन, मॅग्नेशियम, व्हिटॅमिन बी-३ यांसारख्या आरोग्यदायी घटकांचा शरीराला लाभ होतो. भरड धान्यांमुळे कोणत्याही प्रकारची ॲलर्जी होत नाही.



भरड धान्याच्या पदार्थाशिवाय कोणत्याही शाकाहारी थाळीला पूर्णता येत नाही. भरड धान्ये ही अश्मीयुगीन काळापासून मानवाला माहीत असलेली धान्ये आहेत. गहू आणि तांदूळ ही पिके विकसित होण्याअगोदर मानवप्राण्याचा उदरनिर्वाह कंदमुळे आणि भरड धान्ये यांच्यावरच होत असे. आफ्रिका, आशियासह सर्वच खंडांमध्ये स्थानिक भरड धान्ये लोकप्रिय आहेत. पशुखाद्य म्हणूनही ती शेतक-यांसाठी उपयुक्त ठरतात. बाजरीचा वापर मानवी आहारासाठी तसेच पशुखाद्य म्हणूनही केला जातो. जगाची लोकसंख्या वाढते आहे. काही प्रांतांमध्ये कुपोषणाचा प्रश्न भेडसावतो आहे. पाण्याची उपलब्धताही माणसाला हवी तितकी कधीच नसते. या स्थितीत कोरडवाहू भागातील लहान, मध्यम शेतक-यांसाठी भरड धान्ये उपयुक्त ठरू शकतात. ज्वारी, बाजरी ही धान्ये कमी पाण्यात आणि आत्यंतिक तापमान असलेल्या भागातही घेता येतात. सरासरी २०० ते ५०० मिलिमीटर इतके कमी पर्जन्यमान असलेल्या प्रदेशातही ती तग धरतात. जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी जवळपास १५ टक्के लोकसंख्या भारतात वास्तव्य करते. मात्र, जगातील एकूण जलसंसाधनांपैकी केवळ चार टक्केच काय ती जलसंसाधने भारतात आहेत. यामुळे भरड धान्यांची वाढती लागवड देशात उपयुक्त ठरू शकते.

या धान्यांची आणखी एक जमेची बाजू म्हणजे त्यांचा हंगाम ५० ते ६५ दिवस इतक्या कमी काळाचा असतो. योग्य प्रकारे साठा केल्यास भरड धान्ये किमान दोन वर्षे ते कमाल आठ वर्षे टिकू शकतात. भरड धान्यांचे पदार्थ अधिक लोकप्रिय आणि कालसुसंगत बनवणे हे एक आव्हान आहे. बिस्किटे, नूडल्स यांसारखे पदार्थ या धान्यांपासून बनवता आले पाहिजेत. हे पदार्थ करण्याची पद्धतही सोपी पाहिजे. या संदर्भात काही प्रयोग झाले आहेत. काही प्रयोग 'आयआयएमआर' या संस्थेतर्फे करण्यात येत आहेत. या धान्यांपासून शेवया, पापड, नूडल्स असे पदार्थ 'आयआयएमआर' या संस्थेने तयार केले आहेत. हे पदार्थ तयार करण्यासाठी यांत्रिक साधनेही विकसित केली आहेत. या साधनांमुळे हे पदार्थ स्वस्तात बनतात आणि त्यातून उत्पादनही चांगले मिळते. अनेक गावांमधील तरूणांनी या साधनांच्या वापराबाबतचे प्रशिक्षण घेऊन त्यांचा उपयोग ***(कृपया पृष्ठ २७ पाहावे)***

इतिहास

# कृषिसंस्कृतीचा अग्रदूत...

श्रीकृष्ण आणि बलराम या दोन व्यक्तिरेखांनी भारतीय पौराणिक तसेच सांस्कृतिक संचित व्यापलेले आहे. वस्तुतः, बलराम हा कृष्णाचा मोठा भाऊ त्यांमुळे, भावाभावांचा नामोच्चार करत असताना बलरामाचा उल्लेख प्रथम व्हावा, हे स्वाभाविक आणि अपेक्षितही ठरते. परंतु, श्रीकृष्ण या व्यक्तिरेखेचा प्रभाव इतका सघन, सखोल आणि सर्वंकष आहे की बलरामाचे व्यक्तिमत्त्व आणि कर्तृत्व त्याच्या प्रभावळीमध्ये जणू लोपूनच जाते. नावाप्रमाणेच बलवान, जीवनामधील सुखोपभोगांचा समरसून आकंठ उपभोग घेणारा कला आणि क्रीडासक्त, गदायुद्धात तत्कालीन आर्यावर्तामध्ये एकमेवाद्वितीय, शीघ्रकोपी, अंमळ भोळा अशीच बलरामाची प्रतिमा महाभारत, हरिवंश, भागवत यांसारख्या पुराणांमध्ये बलरामविषयक ज्या चरित्रकथा आढळून येतात त्यांद्वारे आपल्या मनावर ठसते. वास्तविक पाहता, त्या काळात या भूमीमध्ये स्थिरावू पाहत असलेल्या कृषिप्रधान संस्कृतीचा बलराम हा अग्रदूत ठरतो. परंतु, त्याचे हे रूप आपल्या नजरेसमोर कधीच उभे होत नाही अथवा केले जात नाही. त्यांमुळे, बलरामाच्या व्यक्तित्वाचा आणि कर्तृत्वाचा वेध, त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे हे परिमाण मनाशी जागते ठेवत, घेणे अगत्याचे ठरावे.

नावाप्रमाणेच बलिष्ठ असलेल्या बलरामाची अनेक पर्यायी नावे साहित्यात आढळून येतात. 'हलिन्', 'हलधर', 'संकर्षण', 'बलभद्र'... यासांरखी बलरामाची अन्य अभिधानेही तत्कालीन व्यवहारात प्रचलीत होती, असे दिसते. यांतील 'हलिन्' आणि 'हलधर' ही दोन नावे मोठी अन्वर्थक होत. 'हल' म्हणजे 'नांगर'. 'हलिन्' अथवा 'हलधर' म्हणजे 'नांगरधारी'. नांगर आणि मुसळ ही बलरामाची दोन आयुधे होत. या दोन्ही आयुधांचा अनुबंध आहे शेतीशी आणि पर्यायाने कृषिसंस्कृतीशी. जमिनीच्या नांगरटीचे साधन म्हणजे नांगर आणि पिकवलेले धान्यधुन्य कांडून त्यांतील दाणे व भुसा वेगवेगळे काढण्याचे उपकरण म्हणजे मुसळ.



गदायुद्धात प्रवीण असलेल्या बलरामाने आयुधे म्हणून नांगर आणि मुसळाचा अंगीकार करावा, हे वास्तव, त्या काळात या भूमीमध्ये स्थिरावू लागलेल्या कृषिसंस्कृतीचे सूचन घडवतात. मुळात, श्रीकृष्ण आणि बलराम यांचे पालनपोषण ज्या गोकुळामध्ये झाले ते सगळे तत्कालीन पर्यावरण पशुपालनप्रधान होते. ज्या यादवांचे नेतेपण कृष्णाने पुढे जीवनभर निभावले ते यादव पशुपालकच होते. बालपणी कृष्ण आणि बलरामाने गोकुळ-वृंदावनामध्ये गायी चारणे, वरूणाची पूजा करण्याऐवजी गाईगुरांना चारा पुरविणा-या गोवर्धन पर्वताची आराधना करण्याचा उपक्रम प्रवर्तित करणे या बाबी नीट समजावून घेतल्या की, बलराम हा पशुपालनाच्या अवस्थेतून उत्क्रांत होत स्थिर जीवनपद्धतीचा संस्कार नव्याने अंगी मुरवत असलेल्या कृषिप्रधानसंस्कृतीचा अग्रदूत ठरतो, ही बाब पुरेशी स्पष्ट व्हायला लागते.

बलराम हा श्रीकृष्णाचा थोरला भाऊ . वसुदेवाच्या गोकुळामध्ये असणा-या रोहिणीनामक दुस-या पत्नीचा हा मुलगा. कृष्णाचा भाऊ असला तरी बलरामाचा स्वभाव आणि प्रवृत्ती कृष्णापेक्षा खूपच निराळी दिसते. धोरणीपणा, चाणाक्षपणा, सततोद्योग, प्रांतिक तसेच राष्ट्रस्तरावरील राजकीय उलाढाली, राजकारणपटुता यांसारख्या गुणांच्या बाबतीत कृष्ण त्याच्या भावापेक्षा केव्हाही आणि किती तरी सरस ठरत आला. किंबहुना, भोळ्या आणि शीघ्रकोपी स्वभावापायी बलरामाने उभी केलेली अनेक खेकटी निस्तरण्यासाठी कृष्णाची बरीच शक्ती आणि वेळ खर्ची पडल्याचे विपुल दाखले आढळतात. असे असले तरी आपल्या या थोरल्या भावाचा अवमान मात्र कृष्णाने कधीही केला नाही, ही बाब या ठिकाणी अधोरेखित करून ठेवावयास हवी. त्याचप्रमाणे, कृष्णाच्या जीवनातील कसोटीच्या अनेक प्रसंगांत बलरामही कृष्णाच्या पाठीशी खंबीरपणे उभा ठाकल्याचे अनेक दाखले आपल्याला सापडतात. याची सुरुवात कृष्ण आणि बलराम यांनी गोकुळामध्ये व्यतीत केलेल्या त्यांच्या बालपणापासूनच होते. या दोघांचा निःपात करण्यासाठी कंसाने एका मागोमाग एक धाडलेल्या दुष्टबुद्धींचा नाश करण्यामध्ये बलरामाने कृष्णाला पुरेपूर साथ दिली. कंसाने मथुरेला पाचारण केल्यानंतर तिथे कृष्ण-बलरामांसाठी कंसाने योजून ठेवलेल्या सा-या अरिष्टांचा सामना करण्यात बलरामानेच कृष्णाची पाठराखण केली.

कंसाचे पारिपत्य ही घटनादेखील तत्कालीन राजकीय व सांस्कृतिक स्थित्यंतराच्या प्रवासातील एक निर्णायक वळण ठरते. उत्क्रांतीदरम्यानच्या भटक्या पशुपालक टप्प्यामधून, मानवी समाजाच्या, कृषिप्रधान जीवनाच्या पर्वात त्या वेळी घडून येत असलेल्या परिवर्तनाच्या जोडीनेच जे एक राजकीय व प्रशासनिक स्थित्यंतर तत्कालीन समाजव्यवस्थेमध्ये साकारत होते, ते या संदर्भात समजावून घेणे गरजेचे आहे. कंसाने त्याच्या जन्मदात्या वडिलांना, म्हणजे, उग्रसेन नावाच्या राजाला कारागृहात बंदिवान करून मथुरेचे राज्य बळकावलेले होते. यादवांचे मथुरेचे ते राज्य म्हणजे लोकसत्ताक गणराज्य होते, ही बाब अनेकांना ज्ञात नसते. त्या प्रजासत्ताक राज्याचा उग्रसेन हा लोकनियुक्त राजा होता. कंसाची मूळ प्रवृत्तीच साम्राज्यवादी होती. त्यांतच, तत्कालीन आर्यावर्तातील एक बलाढ्य सत्ता गणल्या जाणा-या मगधाधिपती जरासंधाच्या अस्ति आणि प्राप्ती या दोन मुलींशी कंसाचा विवाह झालेला होता. जरासंध हा तर कमालीचा साम्राज्यवादी. परिसरातील अनेक गणराज्ये गिळंकृत करून त्या गणराज्यांच्या लोकनियुक्त राज्यकर्त्यांना जरासंधाने त्याचे मांडलिकत्व स्वीकारणे भाग पाडले होते. या सगळ्यांतून कंसाच्या राजेशाही वृत्तीला खतपाणी मिळून त्याने मथुरेचे यादव गणराज्य खालसा करून गादी बळकावली. यादवांच्या लहानलहान गणराज्यांचे विसर्जन घडवून आणत स्वतःचे एक बलशाली साम्राज्य निर्माण करण्याचा कंसाचा मानस होता. कंसाच्या त्या कृत्यापायी यादवांपैकी अनेक गट-उपगट त्याच्यावर नाराज होते. कृष्ण आणि बलराम या दोघांच्या माध्यमातून कंसाचा पुरता पाडाव होण्यात त्या दोघांना यादवांमधील त्या नाराजांचे बहुविध साहाय्य लाभले. कंसाचे निर्दालन करून कृष्ण आणि बलरामाने उग्रसेनाला पुन्हा लोकनियुक्त शासक म्हणून नियुक्त करीत मथुरेचे प्रजासत्ताक पुन्हा एकवार स्थापन केले.

साहजिकच, या सगळ्याची परिणती जरासंधाचे शत्रुत्व ओढवून घेण्यात झाली. जरासंध हा कंसाचा सासरा. आपल्या जावयाचा सर्वनाश केला म्हणून कृष्ण आणि बलरामाचा वैरी बनलेल्या जरासंधाने पुढे मथुरेच्या गणराज्यावर तब्बल १७ वेळा स्वा-या केल्या. अखेर, जरासंधाच्या त्रासाला वैतागून मथुरेचे राज्य हलवण्याचा निर्णय कृष्ण आणि बलरामाने घेतला.



नवीन राजधानी स्थापन करण्यासाठी मग त्यांनी निवड केली ती सुदूर पश्चिम समुद्रकिना-यावर वसलेल्या द्वारकेची. यादव साम्राज्याचे स्थलांतर मथुरेहून द्वारकेला घडून आल्यानंतर त्या परिसरात असणा-या आनर्त देशाचा राजा असणा-या रैवताची मुलगी जी रेवती तिचा विवाह बलरामाशी झाला. बराच काळ बलराम आपल्या सासुरवाडीलाच व्यतीत करत असे, या बाबतचे उल्लेख ग्रंथांत आढळतात.

स्वभावाने तसा भोळा असल्यामुळे, अंतिमतः अहितकारक ठरणा-या अशा बलरामाच्या अनेक योजना विफल ठरवण्यासाठी कृष्णाला बरीच धावपळ आयुष्यभर करावी लागल्याचे दाखले सापडतात. स्वतःची सहोदर बहीण असलेल्या सुभद्रेचे लग्न दुर्योधनाशी व्हावे, अशी बलरामाची मनोमन इच्छा होती. कृष्णाने मोठ्या हिकमतीने सुभद्रेचा विवाह लावून दिला अर्जुनाशी. वत्सला नावाची एकच मुलगी बलरामाला होती. दुर्योधनाबद्दल आणि पर्यायाने कौरवांबद्दल वाटत असणा-या आत्मीयतेपोटी वत्सलेचा विवाह दुर्योधनाच्या मुलाशी करण्याचा घाट बलरामाने घातला. मग, कृष्णाच्याच प्रेरणेवरून, भीम आणि हिडिंबा यांचा मुलगा असणा-या घटोत्कचाने छद्म विद्येचा बेमालूम अवलंब करून आयत्या वेळी ते लग्न उधळून लावले. आपल्या मोठ्या भावाचा अधिक्षेप होऊ नये यासाठी कृष्ण सदैव दक्ष राहत आला ही वस्तुस्थिती असली तरी बलराम मात्र कृष्णावर वेळप्रसंगी रुष्ट होत असे, याचीही उदाहरणे आहेत.

स्यमंतक मण्याचे प्रकरण हे त्यांतीलच एक. स्यमंतक मणी कृष्णानेच चोरून स्वतःजवळ ठेवला असल्याचा बलरामाचा दृढ ग्रह होता. तो दूर करण्याचा पुष्कळ प्रयत्न कृष्णाने केला. मात्र, बलरामाचे काही समाधान त्यांमुळे झाले नाही. कृष्णावर रागावून, मग, बलराम चांगली तीन वर्षे मिथिलेला जाऊन राहिला. त्या काळात, अत्यंत धोरणीपणाने दुर्योधनाने मिथिलेला बलरामापाशी राहून गदायुद्धात प्राविण्य संपादन केले. खुद्द बलरामाचीच तालीम मिळाल्यामुळे गदायुद्धात दुर्योधनाचा हात त्या काळी उभ्या आर्यावर्तात कोणीच धरू शकत नसे. महाभारत युद्धाच्या अखेरीस झालेल्या भीम आणि दुर्योधनाच्या गदायुद्धादरम्यान हे वास्तव पुन्हा एकवार अधोरेखित झाले. गदेच्या द्वंद्वयुद्धात भीमाचा भर ताकदीवर राहत आला,

तर, दुर्योधन गदेच्या युद्धकलेत निष्णात ठरत राहिला. अखेर, गदायुद्धाच्या संकेताचा भंग करीत कमरेखाली गदेचे आघात करून भीमाने त्या द्वंद्वात दुर्योधनाला विकळ पाडल्यानंतर तिथे उपस्थित असलेला बलराम संतापाने नांगर पेलून भीमाला मारण्यासाठी त्याच्या अंगावर धावून गेला. कृष्णाने पार त्याच्या कमरेला विळखा घालत बलरामाला आवरले आणि दुर्योधनाची दुष्कृत्ये आणि भीमाची प्रतिज्ञा यांचे स्मरण करून देत त्याला शांत केले.

शीघ्रकोपी अशी ख्याती असणारा बलराम गदेप्रमाणेच द्यूत खेळण्यातही माहीर होता. श्रीकृष्णाची धर्मपत्नी रुक्मिणीचा सख्खा भाऊ असणा-या रुक्मीची नात रोचना आणि कृष्णाचा मुलगा अनिरुद्ध यांचे लग्न ठरले. यादवांचे सारे व-हाड लग्नसमारंभासाठी द्वारकेहून रुक्मीची राजधानी असणा-या भोजकटक नगरीमध्ये पोहोचले. मोठ्या थाटामाटात विवाहसोहळा संपन्न झाला. फुरसतीच्या वेळेत, मग, द्युताचा डाव रंगला. बलराम आणि रुक्मी दोघेही द्यूत खेळायला बसले. द्युतामध्ये रुक्मी लबाडी करतो. तो खोटे खेळतो. बलराम प्रथम हरतो. मात्र, रुक्मीचा खोटा खेळ बलरामाच्या ध्यानात येतो. खेळामध्ये लबाडी नको, असे सांगत बलराम त्याला समजावतो. खेळ पुन्हा चालू होतो. पुढील डाव बलराम जिंकतो. मात्र, रुक्मी ते मान्य करायचे नाकारतो. संतापाच्या भरात बलराम गदेच्या एकाच आघाताने रुक्मीला थेट यमसदनालाच धाडतो !

असे बहुढंगी व्यक्तिमत्व असणा-या बलरामाला कृषिसंस्कृतीचे अग्रदूतत्व शोभून दिसण्यास आणखी एक प्रसंग कारणभूत ठरतो. कृष्णाचा मुलगा सांब दुर्योधनाच्या लक्ष्मणानामक मुलीचे हरण करतो. त्या दोघांचे परस्परांवर प्रेम असते. सांबाला तिच्याशी लग्न करायचे असते. सगळे कौरव त्या दोघांचा पाठलाग करून सांबाला बंदिवान बनवतात. या संदर्भात रदबदली करण्यासाठी कृष्ण योजना करतो ती बलरामाची. चर्चेसाठी बलराम हस्तिनापुराला येतो. त्याच्याशी चर्चा करण्यासाठी राजा धृतराष्ट्र नगरीबाहेर येतो. चर्चेनंतर धृतराष्ट्र पुन्हा नगरात जातो आणि काही काळाने विवाहाचा तो प्रस्ताव कौरवांना अमान्य असल्याचा निरोप बलरामाला मिळतो. त्यांमुळे संतापलेला बलराम थेट उभ्या हस्तिनापुराचीच कोंडी करतो. धान्यधुन्य, भाजीपाला, फळफळावळ, दूधदुभते यांचा पुरवठा



बंद झाल्यानंतर अखेर कौरवांकडून समेटाचा प्रस्ताव येतो. एकदा बलराम यमुनेच्या तीरावर पूजेसाठी बसतो. पूजेदरम्यान पाण्याची गरज भासल्याने यमुनेने पूजास्थानी प्रविष्ट व्हावे, अशी विनंती बलराम करतो. ती विनंती यमुना धुडकावून लावते. त्या वेळी, क्रोधाविष्ट झालेला बलराम नांगराची अशी एक रेघवजा चर ओढतो की त्यांपायी यमुनेचा प्रवाहच त्याची दिशा बदलतो आणि पूजास्थळाकडे वळतो. या कथेचा अन्वय लावायचा तर, नदीचे वाहणारे पाणी वळवून शेतीसाठी अत्यावश्यक असलेल्या सिंचनाची काही तरी आद्य व्यवस्था बलरामाने त्या काळी केली असावी, असे मानण्यास जागा आहे. धान्यनिर्मितीचे साधन असणारा नांगर आणि निर्माण केलेल्या धान्यावर प्राथमिक प्रक्रिया करण्याचे उपकरण असणारे मुसळ वागविणारा, सिंचनाची आद्य व्यवस्था रेखाटणारा बलराम कृषिसंस्कृतीचा अग्रदूत ठरतो तो या अर्थाने ! ■■

**मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन**

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत १९व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणा-या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक - नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५ किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

*(पृष्ठ क्रमांक २० वरून)*

करायला सुरुवात केली आहे. अन्नधान्यप्रक्रिया उद्योगातील काही नवस्थापित ('स्टार्ट अप') कंपन्यांनाही 'आयआयएमआर'तर्फे मार्गदर्शन केले जाते. भरड धान्यांचे उत्पादन घेणा-या शेतक-यांना बाजारपेठेशी जोडणे, त्यांच्या उत्पन्नात वाढ करणे हा या मागील हेतू. यासाठी काही प्रशिक्षण कार्यक्रमही आखण्यात आले आहेत. अशा उपक्रमांद्वारे पुढ्यात येत असलेली काही यशस्वी उदाहरणे या क्षेत्रात प्रवेश करू इच्छिणा-या हिकमती उमदेवारांचा हुरूप वाढविणारी अशीच आहेत. जे. सुरेश हा अभियांत्रिकीतील पदवीधर. सहा वर्षे तंत्रज्ञ म्हणून नोकरी केल्यानंतर तो स्वतःचा व्यवसाय करण्याकडे वळला. त्याने चेन्नईत 'मिलेट रेस्टॉरंट' सुरू केले. या रेस्टॉरंटमध्ये भरड धान्यांचेच पदार्थ तयार केले जातात. ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे पाहून सुरेशने चेन्नईत आणखी एक शाखा सुरू केली. ही अशी उदाहरणे आज मोजकी दिसत असली तरी ही दिशा खचितच उमेद वाढवणारी अशीच आहे.

डेक्कन डेव्हलपमेंट सोसायटी ही संस्था गेली तीस वर्षे आंध्र प्रदेशातील झहीराबाद विभागात (सध्या हा विभाग तेलंगणात आहे) भरड धान्याच्या विकासासाठी सक्रिय आहे. शेतक-यांना भरड धान्ये घेण्यासाठी तिने सतत प्रोत्साहन दिले. त्यांना बियाणे उपलब्ध करून देण्यापासून ते बाजारपेठेत उत्पादनांना चांगला भाव मिळावा यासाठी संस्थेने प्रयत्न केले आहेत. या प्रयत्नांना मिळालेला प्रतिसाद पाहून भरड धान्य उत्पादकांचे देशभर जाळे निर्माण करावे असे या संस्थेला वाटू लागले. यामुळे संस्थेने पुढाकार घेऊन २००७ सालातील ऑक्टोबर महिन्यामध्ये 'मिलेट नेटवर्क ऑफ इंडिया' (मिनी) या भरड धान्यविषयक बहुविध कार्य करणा-या देशव्यापी संघटनेची स्थापना केली. या संस्थेत विविध क्षेत्रांमधील १२० प्रतिनिधींचा समावेश आहे. यामध्ये सुमारे ५० शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी, वैज्ञानिक, आहारतज्ज्ञ, माध्यमे आणि महिला संघटनांच्या प्रतिनिधींचा समावेश आहे. देशभरातील १५ राज्यांमधील सुमारे ६५ हजार भरड धान्य उत्पादकांशी ती संबंधित आहे. भरड धान्ये प्रामुख्याने घेतली जातात ती शेतकरी कुटुंबाची अन्नधान्याची रोजची गरज भागावी या उद्देशाने.



भरड धान्यांचे व्यावसायिक तत्वांवर उत्पादन घेणे ही आजही अनेक शेतक-यांच्या आवाक्यापलीकडची बाब ठरते आहे. पृथ्वीच्या पृष्ठभागाचे वाढते तापमान, वारंवार येणा-या उष्णतेच्या लाटा यांचा विपरित परिणाम जगभरातील अन्नधान्य उत्पादनावर होतो आहे. या पार्श्वभूमीवर, बाजरीसारखे पीक भविष्यात महत्त्वाचे ठरू शकते. बाजरी किती तापमानात तग धरू शकते या बाबतचा एक प्रयोग जगभरातील ३० कृषी संशोधनसंस्थांमधील ६५ वैज्ञानिकांनी २०१७ साली केला. ४२ अंश सेल्सिअस तापमानात टिकून राहण्याची बाजरी या पिकाची क्षमता असल्याचा निष्कर्ष त्यांनी त्या संशोधनांती काढला. जगभरातील बाजरीच्या एकूण उत्पादनापैकी जवळपास ४१ टक्के इतके उत्पादन एकट्या भारतात होते. भारत हा जगातील सर्वाधिक बाजरी उत्पादक देश आहे. जगभरातील सुमारे ९ कोटी लोकांच्या रोजच्या आहारात बाजरी असते.

केंद्रीय शेतीखात्याच्या २०१६-१७ मधील आकडेवारीनुसार या धान्याचे आपल्या देशातील उत्पादन १ कोटी ७० लाख टनांच्या घरात आहे. २०३० सालापर्यंत ते ४ कोटी ५० लाख टनांपर्यंत नेण्याचा सरकारचा प्रयत्न असणार आहे. आपल्या देशात भरड धान्यांचे उत्पादन सध्या सुमारे १ कोटी ६० लाख हेक्टर क्षेत्रावर घेतले जाते. हे क्षेत्र वाढावे यासाठीही जारीने प्रयत्न होत आहेत. केंद्र सरकारने २०१३ साली राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा केला. भरड धान्यांचा समावेश स्वस्त धान्य दुकानांमधून दिल्या जाणा-या धान्यांमध्ये करावा, अशी शिफारस या कायद्यात केलेली आहे. या शिफारसीची अंमलबजावणी विविध राज्यांमध्ये आज कमालीच्या विस्कळीत स्वरूपात होताना दिसते. ती कार्यक्षमतेने झाल्यास भरड धान्यांच्या उत्पादनाला चालना मिळू शकेल. दुष्काळी स्थितीतही या पौष्टिक धान्यांचे पीक घेता येते ही त्यांची सर्वांत मोठी जमेची बाजू.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या अन्न आणि शेती संघटनेने (एफएओ) २०२३ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्ष' म्हणून साजरे करण्याचा निर्णय अगदी अलीकडेच (म्हणजे, ऑक्टोबर २०१८ मध्येच) घेतला आहे. भारताने या संबंधी पाठविलेला प्रस्ताव स्वीकारण्यात आला, ही बाब या संदर्भात लक्षणीय ठरावी. ■■

*(पृष्ठ क्रमांक ४ वरून)*

दसरा-दिवाळीच्या सणांचा अनुबंध दुसरीकडून जुळलेला आहे तो पराक्रमाशी. दस-याचे सीमोल्लंघन मर्दानी थाटात करून मुलुखगिरीसाठी बाहेर पडावयाचे, हा आपल्या भूमीतील एक पारंपरिक संकेत. एक वेळ दुस-याच्या मुलुखावर आपणहून स्वारी केली नाही तरी, समजा, दुस-याने आपल्या भूमीवर आक्रमण केले तर त्याची नांगी ठेचण्यासाठी तरी आपल्या देशाची संरक्षणव्यवस्था कायमच सिद्ध असली पाहिजे. देशाच्या सीमांचे संरक्षण ही केवळ सशस्त्र दलांचीच काय ती जबाबदारी नाही तर, देशातील प्रत्येकच नागरिकाचे ते आद्य कर्तव्य ठरते, असा रोकडा संदेश देणारे निवृत्त एअर मार्शल भूषण गोखले यांचे या अंकातील विवेचन आपल्या सगळ्यांच्याच विचारचक्राला एक नवीन दिशा बहाल करेल. 'जय जवान, जय किसान' ही जोडघोषणा या सगळ्या पार्श्वभूमीवर एका वेगळ्या अर्थाने आजही अर्थवाही ठरते. आपल्या देशातील शेतीमध्ये भरड धान्यपिकांना अलीकडील काळात येत असलेल्या महत्वामागील कार्यकारणभाव उलगडून दाखवणारा या अंकातील लेखही वाचनीय ठरावा. ■■

---

**संदर्भ :**

१) दुबई येथे तारीख ६ सप्टेंबर ते ९ सप्टेंबर २०१८ या काळात आयोजित करण्यात आलेल्या आठव्या विश्व मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून एअर मार्शल भूषण गोखले यांनी केलेले भाषण.

(२) महाराष्ट्राच्या लोकव्यवहाराचे व्यासंगी अभ्यासक डॉ. सदानंद मोरे यांचे 'बलराम : कृषिसंस्कृतीचा अग्रदूत' या विषयावर भारतीय किसान संघाने पुणे येथे तारीख ८ ऑक्टोबर २०१८ रोजी पुणे येथे आयोजित केलेले व्याख्यान.

(३) भारतीय संस्कृतिकोश : खंड ६ : बंगाल ते मराठी भाषा व साहित्य; संपादक - पंडित महादेवशास्त्री जोशी, १९९२, पुणे, पृष्ठ क्रमांक ६६-६८.

४) डाऊन टू अर्थ, डब्ल्यू डब्ल्यू डब्ल्यू इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मिलेट रीसर्च, नेचर बायोटेक्नॉलॉजी नियतकालिक. डब्ल्यू डब्ल्यू डब्ल्यू इक्रिसॅट डॉट कॉम. ■■



## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक अ‍ॅन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

## 'अर्थबोधपत्रिका' वर्गणीदारांसाठी विशेष योजना

| | |
|---|---|
| **वार्षिक वर्गणी** | **२०० / - रुपये** |
| **द्वैवार्षिक वर्गणी** | **३५०/ - रुपये** |
| **त्रैवार्षिक वर्गणी** | **५००/ - रुपये** |
| **पंचवार्षिक वर्गणी** | **८००/ - रुपये** |

# ग्रंथालयातील नवीन पुस्तके

**ADVICE & DISSENT**
**MY LIFE IN PUBLIC SERVICE**
**Author : Y. V. Reddy, Harper Business,**
**Noida, Uttar Pradesh, 2017,**
**Pp. Xvi + 480, Price - Rs. 799/-**

आपल्या देशातील एक अत्यंत कुशल अर्थप्रशासक आणि भारतीय रिझर्व्ह बँकेची धुरा अतिशय नाजूक काळात समर्थपणे पेललेले प्रगल्भ गव्हर्नर म्हणून यागा वेणुगोपाल रेड्डी हे सगळ्यांनाच परिचित आहेत. भारतीय प्रशासकीय सेवेमध्ये १९६४ साली प्रविष्ट झाल्यापासून ते रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरपदावरून निवृत्त होईपर्यंत एक निर्भिड, स्पष्टवक्ता, कार्यक्षम, बुद्धिमान अधिकारी म्हणून रेड्डी यांचा लौकिक गाजत राहिला. प्रत्युत्पन्न मतीचे वरदान लाभलेल्या रेड्डी यांचा स्वभाव जन्मजातच विलक्षण मिष्किल. कमालीची प्रवाही, खेळकर, प्रसन्न आणि वाचकाशी चट्‌दिशी संवाद साधणारी लेखनशैली हस्तगत असलेल्या रेड्डी यांनी शब्दबद्ध केलेले हे आत्मकथन म्हणजे सर्वसामान्य वाचकापासून ते अर्थव्यवहार, वित्तीय क्षेत्रातील उलाढाली, बँकिंग, अर्थप्रशासन यांसारख्या जीवनांगांबाबत जिज्ञासा असणा-या सगळ्यांनाच जणू मेजवानीच ठरावी. अर्थप्रशासनातील बारकावे, क्लिष्टता, गुंतागुंत, राजकीय परिस्थितीची मागणी आणि अर्थशास्त्रीय संकेत व शिस्त यांची सांगड जुळवताना अर्थप्रशासकांना करावी लागणारी तारेवरील कसरत यांचे तपशील रेखाटत असतानाच, पैसाधोरणासारख्या तांत्रिक बाबीशी संलग्न अनेकानेक प्रमेयांचा उलगडा करणा-या रेड्डी यांची अर्थशास्त्रावरील पकड आपल्या मनावर बिंबते. तर, एन्. टी. रामाराव यांच्याबरोबर व्यतीत केलेल्या कार्यकाळाची सफर घडवताना रेड्डी यांच्या व्यक्तिमत्त्वातील तितकाच समर्थ आणि कुशल लेखकही आपल्याला इथे भेटतो. ■■



**RNI Regn.No. MAHMAR/2002/9806**
**Postal Regn.No.: PCW/115/2016-2018**
**Posted at Model Colony Post Office Pune, on 10th of each month**

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ●इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ●भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे.

●अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग -व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे.

●इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/ पत्रके/ पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ●संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक (जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी) चालवले जाते. ●संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ●अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणा-या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**- संस्थेचे नियंत्रण मंडळ -**

●विकास चित्रे ●किशोर चौकर ●सुरिंदर जोधका ●रमानाथ झा ●अभय टिळक ●रवींद्र ढोलकिया ●दिलीप नाचणे ●सुहास पळशीकर ●मनोहर भिडे ●नीळकंठ रथ ●रूपा रेगे - नित्सुरे ●एस. श्रीरामन्

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**